# एका महानगराचा मृत्यू...

राजेशला जाग आली, तेव्हा त्याच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला होता. घामाचे कारण दमट हवा नव्हे, हे त्याला आता पूर्वानुभवाने पटले होते... कारण होते त्याला पडलेले स्वप्न, नव्हे दुःस्वप्न. अलीकडे हे दुःस्वप्न सारखे सारखे पडत होते. सुरुवातीला त्याने दुर्लक्ष केले, पण आता मात्र जवळजवळ रोज रात्री ते भेडसावणार असेल तर तज्ज्ञाचा सल्ला घेणे आवश्यक होते. पण या धकाधकीच्या जीवनात त्यासाठी वेळ आणि शक्ती काढणे मुश्किल होते.

त्याने शेजारच्या टेबल लॅम्पचा स्वीच दाबला, पण दिवा लागला नाही. बरोबर आहे. अजून वीज यायची वेळ झाली नव्हती. वीज दिवसातून काही ठराविक वेळीच येई. घरगुती ग्राहकांसाठी सकाळी साडेपाच ते आठ आणि सायंकाळी साडे सहा ते दहा. ऑफिसांमध्ये सकाळी नऊ ते साडेपाच. वीज सर्वांना पुरावी म्हणून हा रेशनिंगचा प्रकार. अर्थात मिळेल तेव्हा वीज गोळा करून बॅटरी चार्ज करून चालणारी उपकरणे बाजारात मुबलक मिळत होती. त्यांचा वापर नियमबाह्य आहे का, यावर तज्ज्ञांचे दुमत होते. जर वीजपुरवठा पुरेसा नाही, म्हणून त्यात कपात केली तर वीज मिळते तेव्हा अशा उपकरणात ती साठवणे कितपत रास्त होते ? खुद्द वीज कंपनीला.खात्री नसल्याने अद्याप अशा प्रकरणावर कोर्ट केस झाली नव्हती.

राजेशने एक रिचार्जेबल ट्यूबलाइट लावली. सकाळचे पाच वाजले होते. ठीक आहे. लवकर उठलो तर सकाळचा 'रश अवर' टाळून आधीच कामावर जाऊ, असा त्याने विचार केला.

इ. स. २०४० साली मुंबई महानगराची लोकसंख्या तीन कोटींच्या घरात गेली होती. पश्चिमेकडे तारापूरपर्यंत तर पूर्वेकडे कर्जतपर्यंत हे महानगर आता पसरले होते. समुद्र आणि सह्याद्री दोघांनी कसेबसे या शहराला थोडेफार आवरले होते. पण 'सुधारित' तंत्रज्ञानापुढे त्यांचा किती दिवस टिकाव लागेल सांगणे कठीण होते. वाढत्या जनसंख्येची वीज-पाणी इत्यादींची मूलभूत गरज भागवणे, हे काही त्या तंत्रज्ञानाला जमले नव्हते. राजेश राहात असे त्या हाऊसिंग बोर्डाच्या इमारतीत केवळ एक तास पाणी रोज येई. शाळांच्या तीन शिफ्टस् सुरू होऊन दहा वर्षे उलटली होती. वेस्टर्न रेल्वेच्या गाड्या चोवीस तास तर सेंट्रलच्या साडे बावीस तास, लोकांची ने-आण करीत होत्या. म्हटले तर दर सत्तावीस सेकंदाला एक गाडी चर्चगेटहून सुटे; पण ट्रॅफिक इतका दाट असल्याने पन्नास वर्षांपूर्वीच्या वेळापत्रकात काहीच सुधारणा नव्हती. राजेशच्या विरार-चर्चगेट ट्रीपला गाडीचा नियोजित वेळ पंच्याण्णव मिनिटे होता. त्याच्या आजोबांनी हाच प्रवास यापेक्षा कमी वेळात केलेला होता.

राजेश तासाभरात तयार झाला. 'फास्ट फूड'च्या प्रकारांमुळे त्याला त्या वेळात आपला डबा पण बरोबर घेता आला. हा डबा ऑफिसमधल्या मायक्रोवेव्हमध्ये तीन मिनिटे ठेवला की, आतले जेवण गरमागरम. त्याचे आजोबा डबेवाला वापरत, पण आज ती संस्था लुप्त झाली होती...

राजेशने दार उघडून काळजीपूर्वक पाय बाहेर टाकला. कारण रेल्वे प्लॅटफॉर्मप्रमाणे त्याच्या फ्लॅटच्या बाहेरच्या जागेत लोक अस्ताव्यस्त झोपले होते. ते दृश्य पण नित्याचेच होते...

मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येला आळा घालणे एकाही राज्यकर्त्याला जमले नव्हते. एक अपवादात्मक प्रयत्न २०२५ साली झाला होता. त्या वेळचे कॉर्पोरेशनचे कमिशनर धडाडीचे होते. त्यांनी फतवा काढला की, यापुढे काम मिळाल्याचा दाखला असल्याशिवाय मुंबईत प्रवेश नाही. ट्रेन, बस व इतर वाहनांतून मुंबईत शिरणाऱ्यांना थांबवून वेशीवरून परतवण्यात येऊ लागले. बिचाऱ्या मुंबापुरीस थोडे हायसे वाटते न वाटते, तो वेगवेगळ्या संस्थांनी या फतव्याविरुद्ध आक्रोश सुरू केला. 'मूळ अधिकारांची पायमल्ली', 'मानवी दृष्टिकोनावर प्रहार', 'गोरगरिबांवर अन्याय'... इत्यादी आरडाओरड, उपोषणे, मोर्चे आदींनी कमिशनर साहेबांवर प्रहार करायला सुरुवात केली. पण ते खंबीर राहिले. अखेर एका न्यायाधीशाने हा फतवा रद्दबातल ठरवला आणि त्यावर हायकोर्टाने शिक्कामोर्तब केले. कमिशनर साहेबांची कुठल्या तरी बोर्डाचे चेअरमन म्हणून मुंबईपासून दूर ट्रान्स्फर झाली आणि... पुन्हा जैसे थे! हाय गे मुंबापुरी!

सकाळी साडेसहाला राजेश भरलेल्या बसमधून कसाबसा मार्ग काढत स्टेशनवर उतरला. ही बस त्याला पहिल्याच प्रयत्नात मिळाली होती... लवकर उठल्याचा फायदा! एरव्ही त्याला माणसांनी ओथंबणाऱ्या अनेक बसेस सोडून द्याव्या लागत. तोच फायदा ट्रेनच्या बाबतीतही. सहा चाळीसची लोकल त्याला सहज मिळाली. शिवाय ही 'नॉनस्टॉप' होती... म्हणजे केवळ सिग्नलच्या लाल दिव्यांसाठी स्टेशन दरम्यान थांबणारी. त्याने अंदाज केला की, आठ-सव्वा आठच्या दरम्यान तो चर्चगेटला पोचेल.

गाडीने वेग घेतला तसा त्याच्या विचारांना वेग आला. आणि अशा वेळी ते स्वप्न हटकून मनात येई. सारखा स्वप्नाचा विचार केल्याने ते स्वप्न पडत राहते की स्वप्न सारखे पडत राहते म्हणून आपण जागेपणी त्यावर विचार करतो ?

सुमारे पाच वर्षांपूर्वी एका जुन्या पुस्तकात वाचलेल्या वृत्तांतापासून त्या स्वप्नाची सुरुवात झाली होती. विसाव्या शतकातल्या एका प्रख्यात वास्तुशास्त्रज्ञाचे ते पुस्तक होते. १९६०-७०च्या दरम्यान मुंबईत वेगाने वाढ होऊ लागली, तेव्हा 'टाऊन प्लॅनिंग'च्या दृष्टिकोनातून या वाढीच्या दिशा ठरवण्यासाठी नगररचनातज्ज्ञांची समिती कार्यरत होती, तिचे ते सभासद होते. समितीने दूरगामी दृष्टिकोनातून काही महत्त्वाच्या शिफारशी केल्या होत्या, पण त्यांना शासनाने केराच्या टोपलीत नाही, तरी लाल फितीत बांधून टाकले... आणि मुंबईची वाटेल तशी वाढ होऊ दिली. आणि मुंबईकर ती सहन करत राहिला.

सदर पुस्तकात लेखकाने या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुंबईकरांची तुलना एका तापत जाणाऱ्या पाण्यातल्या बेडकाशी केली होती. एका पातेल्यात पाणी गरम होत आहे आणि समजा, त्यात एक बेडूक आहे. सुरुवातीला त्याला वाढत्या तापमानाचा त्रास होत नाही. पुढे त्याला त्रास जाणवू लागतो व पातेल्यातून उडी मारून पळून जायची त्याला इच्छा होते. परंतु इतका वेळ चाललेय, थोडे सहन करून इथेच राहू. अशा भावनेने तो बाहेर उडी मारत नाही. वाढत्या तापमानाशी तडजोड करून तेथेच राहायची त्याची प्रवृत्ती टिकून राहतेच. पण अखेर ठराविक मर्यादेपलीकडे तापमान गेल्यावर त्याची तडजोड करायची इच्छा आणि वाढत्या तापमानाशी प्रतिकार करण्याची शक्ती, सर्व संपुष्टात येऊन त्याचा अंत होतो. हे उदाहरण वाचून राजेशच्या मनावर जो काही ठसा उमटला, त्यातूनच त्या दुस्वप्नाला सुरुवात झाली. स्वप्नात बेडकाची जागा स्वतः राजेशने घेतली आणि पातेल्याऐवजी आला बाथ-टब!... आपण टबात आरामात डुंबलो आहोत... पण पाण्याचे तापमान वाढत आहे...

आपल्याला ते जाणवते पण आपण टबात पडून राहतो. आणि अखेर ते तापमान सहनशक्तीपलीकडे गेलेय... पण आपल्याला टबाबाहेर पडता येत नाही. डोळ्यावर झापड येते. बाहेरच्या जगाकडे दुर्लक्ष करायला लावणारी गुंगी येते... शरीर तक्रार करत असूनही मन तिकडे कानाडोळा करायला सांगते... त्या बेडकाप्रमाणेच आपण अंत होणार काय ?

अशा वेळी त्याला जाग येई.

त्याच्या आजूबाजूला गाडी गच्च भरली होती... माणसे डब्याबाहेर ओथंबून वाहात होती! चर्नी रोड आले की, ह्या समुद्रातून वाट काढत दारापर्यंत पोचायची कसरत सुरू करायची... नाहीतर चर्चगेटवर थांबलेला माणसांचा लोंढा आपल्याला बाहेरच पडू देणार नाही! ही परिस्थिती त्याच्या आजोबांच्या वेळी होती, पण पणजोबांच्या वेळी नव्हती. चोवीसपैकी काही तास तरी गर्दी नसलेला प्रवास करता येई, असे आजोबा सांगत. मात्र बाबांच्या वेळी ती शक्यता संपुष्टात येत होती आणि आता तर तिची कल्पनाही करणे शक्य नव्हते. पण बेडकाप्रमाणे मुंबईकर हे सहन करत होता, तडजोड करत होता.

चर्चगेटवर माणसांच्या लोंढ्याबरोबर तो आपोआप बाहेर पडला, आता दुसरे दिव्य समोर होते... बसने बॅकबे रेक्लेमेशनकडे जायचे. नको ती गर्दी... त्यापेक्षा आता आपण चालतच जाऊ; नाहीतरी आपल्याकडे थोडा वेळ आहेच. भरलेल्या गाडी व बसपेक्षा त्याला भरलेले रस्ते त्यातल्या त्यात बरे वाटले. इथे थोडी मोकळी हवा होती.

गर्दीतून वाट काढत काढत सुमारे पाऊण तासाने तो कफ परेडवर आला. रस्त्याच्या दोन्ही बाजूला गगनचुंबी इमारती आणि त्यांना जोडणारी, मुंबईचा स्थायिभाव झालेली झोपडपट्टीची रांग, गेल्या शतकात- ऐंशी वर्षांपूर्वीपर्यंत इथे मोकळ्या समुद्रीवाऱ्यात रपेट करता येत असे, हे आता कोणाला पटले नसते. कफ परेड सुरू होण्यापूर्वीचे मच्छीमारनगर मात्र पूर्वीप्रमाणे होते. कारण तिथल्या लोकांनी बाहेरच्या दबावाला तोंड देऊन आपले अस्तित्व टिकवले होते.

"धोंडिबा आहे का ?" त्याने थांबून तिथल्या भेळपुरीवाल्याला विचारले.

"तो तर केव्हाच गेला मासे पकडायला." त्याला अपेक्षित असेच उत्तर मिळाले. सर्व होड्या मासे पकडायला लांबवर गेल्या होत्या. त्यामुळे किनारा मोकळा होता. राजेशला धोंडिबाशी थोड्या गप्पा मारता आल्यास हव्या होत्या. धोंडिबा त्याला इथेच, त्याच भेळपुरीवाल्याकडे पाच वर्षांपूर्वी प्रथम भेटला होता. राजेश अन् त्याचा एक दोस्त भेळपुरी खात उभे होते... गप्पा मारत आणि जीवनावर टीका-टिप्पणी करत. त्यांचा एक विषय असे- मुंबईची गर्दी आणि धकाधकीचे जीवन.

त्या दिवशी वादळी हवेचा धोका असल्याने मच्छीमार होड्या किनाऱ्याशीच गर्दी करून होत्या.

"मुंबईत काय गर्दी कमी आहे ? हा एवढासा किनारा तोही होड्यांनी गच्च भरून गेलेला", राजेशचा मित्र म्हणाला.

"याला राज्यकर्तेच जबाबदार... आता या कोळ्यांना इथेच का येऊन कडमडायचे होते; किनारपट्टी नाही का अख्खीच्या अख्खी ? पण जो तो येतो तो मुंबईतच घर करून बसतो", राजेश म्हणाला.



"नाहीतर काय! पण या मच्छीमारांना इथे येऊ नका म्हणून सांगायची शासनाला इच्छाशक्ती नाही," राजेशच्या मित्राने री ओढली.

"तुमचा काहीतरी घोटाळा होतो आहे, साहेब!" एकाएकी त्यांच्या मागून आवाज आला. त्यांनी वळून पाहिले. पेहरावावरून कोळी वाटणारा एक तरुण तिथे उभा होता.

"माफ करा, तुमच्या गप्पांमध्ये घुसखोरी केल्याबद्दल", तो किंचित स्मित करून पुढे म्हणाला, "आम्ही मच्छीमार इथे येऊन कडमडलो नाही. आम्ही इथे पूर्वीपासून आहोत. ब्रिटिशांना मुंबई हुंडा की भेट म्हणून मिळाली, त्याच्या आधीपासून... कडमडला आहात तुम्ही लोक."

"काही तरी वाचा मारतोय लेकाचा," राजेशचा मित्र म्हणाला, पण राजेशची प्रतिक्रिया वेगळी होती.

"माफ करा, आमच्या मित्रांकडून बोलण्यात. आम्हाला इतिहासाचे विस्मरण झाले खरे. जुन्या मुंबईच्यावर काही लिखाण मी वाचले होते. त्यात हा इतिहास आहे... मी राजेश वैद्य. आपले नाव?"

"धोंडिबा म्हणतात मला. आपण चूक कबूल केल्याचा दिलदारपणा दाखवलात, त्याबद्दल आभार. तुम्हाला वेळ असेल तेव्हा माझ्या झोपड्यात या, आमच्या या गावाबद्दल पुष्कळ माहिती मी तुम्हाला देईन." धोंडिबा म्हणाला.

धोंडिबाशी मैत्री तेव्हापासूनची. या गर्दीने गांजलेल्या नगरीपासून रोज दिवसभर दूर मुक्त सागरात विहार करता आल्याने धोंडिबाच्या मनात एक प्रकारचा मोकळेपणा होता. त्याचे अठरा मजली हास्य मुंबईच्या कुठल्याही अठरा मजली इमारतीत राहणाऱ्याला साधले नसते. मनावर कसले दडपण असले की, धोंडिबाशी थट्टामस्करी करून राजेशला बरे वाटे.

आज पहाटेच्या दुःस्वप्नावर तोच उपाय करता आला असता तर? नाइलाजाने कफ परेडवरच्या आपल्या ऑफिसच्या इमारतीकडे राजेश जड पावलाने चालू लागला.

भारताची राजधानी दिल्ली हे राजधानी म्हणून पहिल्या क्रमांकाचे महानगर मानले, तर दुसऱ्या क्रमांकाचा मान मुंबईचा, हे कोणाही भारतीयाने कबूल केले असते. नंबर एकच्या वाट्याला येणारा मानमरातब नंबर दोनला नसला, तरी देशाची वाणिज्य राजधानी म्हणून मुंबईचे वेगळे महत्त्व होते. राजनैतिक उलाढालींपासून लांब, परकीय आक्रमणांपासून अलिप्त, दिखाऊपणापेक्षा कामसूपणावर भर देणारी अशी ही मुंबापुरी... तिला दिल्लीचा हेवा करायचे कधीच कारण नव्हते. उलट मुंबईकडे सतत बाहेरच्यांचा ओघ असायचे कारणच मुळी मुंबईचे सुरळीत जनजीवन हे होते.

परंतु, शहराला खरा धोका या आत्मसंतुष्टतेत होता. वाढती लोकसंख्या आपण पचवू शकतो, त्यामुळे होणाऱ्या अडचणी सोसू शकतो, ही भावना त्या शहराला विनाशाकडे खेचत होती. मधुमेह, रक्तदाब आणि हृद्रोगाने पीडित माणूस औषधपाणी व पथ्य न करता राहू लागला, तर त्याचे आयुष्य लवकर संपेल असे निदान डॉक्टर करतात. पण त्याचा अंत अमुक दिवशी अमुक कारणाने होणार, हे सांगता येत नाही.

२०४० साली मुंबई त्या स्थितीला पोचली होती. पण तिचा अंत आज, १० ऑक्टोबर रोजी होणार, ही भविष्यवाणी कोणी करू शकला नसता.

त्या घटनाक्रमाची सुरुवात झाली, तेव्हा राजेश आपल्या ऑफिसमध्ये नुकताच स्थानापन्न झाला होता. सकाळचे साडेनऊ वाजले होते. राजेशने आपले डिक्टोटायपिंग मशीन चालू केले होते. त्या यंत्रात तो जे बोलेल ते आपोआप टाइप करून मिळे. पण आज तो जेमतेम तीन-चार वाक्ये बोलला नसेल तो ते यंत्र बंद पडले......कारण वीजच बंद पडली होती.

आपल्या साऊंडप्रूफ केबिनमधून बाहेर डोकावून पाहता राजेशला आढळले की, वीजपुरवठा केवळ त्याच्या केबिनपुरताच बंद पडला नव्हता. अचानक वीज बंद पडणे मधून मधून घडत असे. जनरेटरद्वारा जरुरीपुरता वीजपुरवठा चालू होईल, अशा अपेक्षेत प्रत्येकजण होता, पण दहा मिनिटे झाली तरी तसे घडले नाही. उलट काहीतरी कुठेतरी जळते आहे असा एक मंद वास पसरू लागला.

"लगता है कहीं शॉर्ट सर्किट हो गया." गुरुबक्ष सिंह उद्गारला. तो खात्री करून घ्यायला ऑफिसच्या डिस्ट्रिब्युशन बोर्डाकडे धावला. त्याला विजेच्या उपकरणांशी खेळायची हौस होती.

वासापाठोपाठ धूर पण जाणवायला लागला. मात्र ठिकठिकाणी लावलेले स्मोक डिटेक्टर शांत होते. कारण ते लावले तेव्हापासून कोणी त्यांची कार्यक्षमता तपासलीच नव्हती.

मामला गंभीर आहे असा अंदाज घेऊन राजेश ऑफिसबाहेर पडला आणि जिन्याकडे धावला. सुदैवाने बाहेर पसरलेला धूर अजून जिन्यात शिरला नव्हता. तो अकरा मजले उतरून इमारतीबाहेर आला तेव्हा त्याला स्तंभित करणारे दृश्य दिसले. केवळ त्याचीच नव्हे, तर इतर जवळपासच्या पाच-सहा इमारती धुरात गुंडाळल्या होत्या... पण धोक्याच्या सूचना देणाऱ्या घंटा, सायरेन यांचा पत्ता नव्हता आणि पाहता पाहता आणखी इमारती धुरात लुप्त होऊ लागल्या.

इमारती एकमेकांपासून लांब असताना ही आग कशी पसरत होती?

राजेशला प्रश्नाचे उत्तर लगेच सापडले. दिवाळीत फटाक्यांची साखळी उडवतात, त्याप्रमाणे घडत होते. इथे साखळी होती झोपडपट्ट्यांची. विजेचा अवैध वापर व तोही सुरक्षिततेचे नियम धाब्यावर बसवून केल्यामुळे एक झोपडी पेटली. त्यामुळे दोन इमारतींदरम्यानच्या झोपड्या पेटून उठल्या आणि आग इकडून तिकडे पसरली. हे त्याला प्रत्यक्ष पाहायला मिळत होते. एव्हाना आग विझवणारे बंब हजर व्हायला हवे होते. ते का आले नाहीत ? उशीर व्हायला बरीच कारणे होती.

आगीची सूचना देणारी फोन यंत्रणा आधीच बंद पडली होती.

मोटरसायकलवरून प्रत्यक्ष सूचना मिळाली तेव्हा फायर ब्रिगेडवर कोणी हजर नव्हते.

फायर ब्रिगेडच्या लोकांना सूचना देऊन त्यांनी सज्ज होईपर्यंत आणखी वेळ गेला होता.

आग विझवणारे बंब सायरेन वाजवत बाहेर पडले, तेव्हा रस्त्यातील तोबा गर्दीतून त्यांना मार्ग काढता येईना.

तरीसुद्धा जवळची जळणारी इमारत त्यांनी गाठून काम सुरू केले, तेव्हा त्यांना आढळले की, पुरेसा पाण्याचा साठा ठेवलेला नाही.

दरम्यान आग मात्र गर्दीला न जुमानता पसरत होती. नरिमन पॉइंट, मंत्रालय, चर्चगेट करत करत ती व्ही. टी. व गिरगावकडे पसरली आणि उत्तर मुंबईकडे वेगाने वाटचाल करू लागली.

मंत्रालयाच्या पाचव्या मजल्यावर मुख्यमंत्र्यांनी तातडीची मीटिंग बोलावली. पण त्याला उपस्थिती कमीच होती, कारण पोलीस कमिशनर, म्युनिसिपल कमिशनर, वाहतूक यंत्रणा सांभाळणारे अधिकारी सर्वच आपापल्या परीने प्राप्त परिस्थितीला तोंड द्यायचा प्रयत्न करीत होते. पण गर्दी, गोंधळ आणि मोकळ्या जागांचा अभाव यामुळे काहीच करता येत नव्हते.

"छतावर हेलिकॉप्टर आहे ? मी वरून परिस्थितीची पाहणी करतो," मुख्यमंत्री म्हणाले. "कोण येते आहे माझ्याबरोबर?"

"मी येतो, मी येतो"चा गिल्ला सुरू झाला. कारण 'पाहणी' करून मुख्यमंत्री हेलिकॉप्टरमधून मुंबईबाहेर सटकतील, असे सर्वांना वाटले.

पण छतावरच हेलिकॉप्टर चालकाने अशा परिस्थितीत हेलिकॉप्टर चालवणे धोक्याचे ठरेल, असा इशारा दिला. कारण उंच इमारतीतून अक्षरशः गगनचुंबी ज्वालांचे झोत निघत होते. पण मुख्यमंत्र्यांनी तिकडे दुर्लक्ष केले.

आणि हेलिकॉप्टर आपल्या पॅडवरून वर उडाले...

आतापर्यंत मुख्यमंत्र्यांनी हेलिकॉप्टरमधून पूरग्रस्तांची पाहणी केली होती. पण आता दिसणारे दृश्य औरच होते. पसरत जाणारे आगीचे लोट, त्यातून इतके तिकडे सैरावैरा धावणारा जनसमुदाय, पेटून निघालेल्या बसगाड्या, ठिकठिकाणी बंद पडलेल्या लोकल, आगगाड्या...

"आपले सगळे गणित चुकले!" मुख्यमंत्री उद्गारले, "पैसा आणि रोजगार यांच्यामागे लागून आम्ही निसर्गापासून दूर गेलो. हिरवे भाग कमी करत करत तिथे इमारती बांधल्या, समुद्र लांब सारत तिथे पण इमारती बांधल्या... आणि नागरी सुखसोयींकडे दुर्लक्ष केले... आज या निसर्गाने दिलेला दणका आपण पेलू शकलो नाही." ते हताश होऊन मंत्रालयाकडे परतले आणि लवकरच त्यांना तेथून चंबूगबाळे हलवावे लागले. दुपारचे दोन वाजले. तोपर्यंत आग आटोक्यात न येता उत्तरेकडे व पूर्वेकडे एका पाठोपाठ एक उपनगर सर करत पसरत होती आणि लोक आगीच्या तोंडी तरी पडत होते किंवा कसेबसे आगीपासून दूर जाण्याचा प्रयत्न करीत होते. राजेश कफ परेडवरच येरझाऱ्या घालत होता. कुठेही गेलो तरी आगीचा डोंब आपला मार्ग अडवणार तेव्हा इथेच का न थांबा ? तो मच्छिमार नगराजवळ येऊन ठेपला. त्या वेळी दुपारचे तीन वाजले होते. हवा गरम, दमट आणि आसपास गर्दी आणि गोंधळ. त्याला विलक्षण ग्लानी वाटू लागली. त्या महानगराबरोबर आज आपलाही शेवटचा दिवस असा विचार येता येता त्याला घेरी आली. जाग आली तेव्हा त्याला जाणवले आपण शांत परिसरात आहोत. कुठे आहोत ? स्वर्गात ?

"उठलास का ? बरं झालं. एक काळजी मिटली." हे परिचित शब्द ऐकून राजेश उठून बसला. समोर धोंडिबा उभा होता. राजेशच्या हळूहळू ध्यानात आले की, आपण धोंडिबाच्या मोटरबोटमध्ये आहोत, समुद्रात. त्याच्या सुदैवाने सामान न्यायला आलेल्या धोंडिबाने त्याला उचलून आणले होते. "मुंबईचे काय झाले?" त्याने आजूबाजूला पाहिले. दूर चौपाटी दिसत होती माणसांनी भरलेली आणि त्यांच्या पार्श्वभूमीवर होती आगीची भिंत.

"मुंबई खलास झाली" धोंडिबा म्हणाला, "उद्या सूर्योदयापर्यंत तिथे केवळ एकच वसाहत उरेल... जी पूर्वी होती. आमचे मच्छिमार नगर. आज या आमच्या होड्यांनी आमचे रक्षण केले. आमचे सगळे लोक होड्यांतून लांब जाऊन बसलेत, तुझ्या-माझ्यासारखे. उद्या आम्ही परत किनाऱ्यावर जाऊ आणि आमची वसाहत नव्याने उभारू... पण तुम्हा लोकांचे हे अवाढव्य नगर... हे काही एका दिवसात बांधून होणार नाही... जरी तुम्ही ते पुन्हा तसे बांधण्याचा मूर्खपणा केलात तरी."

"लाखाची गोष्ट बोललास तू धोंडिबा!" राजेश उद्गारला. त्याचे घर जळले असणार, नोकरीचे बारा वाजले. पण त्याला आज विलक्षण मोकळे वाटत होते. गेल्या पाऊणशे वर्षांत मुंबईची झालेली अधोगती अखेर संपली होती. आज जरी ती बेचिराख झाली, ती या महादुर्घटनेतून मिळालेली शिकवण माणूस विसरणार नाही, याची त्याला खात्री होती.

आणि आजपासून त्या दुःस्वप्नातून आपली सुटका झाली, याची पण त्याला खात्री होती.

**■ डॉ. जयंत नारळीकर**

विज्ञान कथासंग्रह, प्रकाशक- श्रीविद्या प्रकाशन, प्रथमावृत्ती : १ मे १९९४